**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी -४११०१८**
**वैद्यकीय विभाग**
**ई-निविदा क्र. २/२०२६-२७**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाअंतर्गत राष्ट्रीय कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी दवाखाना / रुग्णालयनिहाय आवश्यक असणा-या टाटा सुमो/इको आसन क्षमता ६+१ अथवा तत्सम वाहने (टुरिस्ट परमिट) वाहने भाडे तत्वावर घेणेकामी वाहन पुरवठाधारक यांचेकडुन ई- निविदा दर मागविणे येत आहेत.

| अ. क्रं. | कामाचा तपशील | अंदाजे र.रू. | बयाणा र.रू. | अनामत र.रू. | कामाचा कालावधी | फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९ टाटा सुमो/इको अथवा तत्सम वाहने भाडे तत्वावर घेणेबाबत (आसन क्षमता ६+१) टुरिस्ट परमिट | २,१०,९०,००० /- | २,१०,९००/- | १०,५४,५००/- | २ वर्ष | २५,७६०/- |

**<u>निविदेचे वेळापत्रक</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | ई निविदा उपलब्ध कालावधी | दि. १२ /०५/२०२६ ते दि. २५/०५/२०२६ |
| २. | निविदा स्वीकृती अंतिम दिनांक व वेळ | दि. २५/०५/२०२६ दुपारी ३.०० वा. पर्यंत |
| ३. | निविदा पुर्व बैठक दिनांक व वेळ<br>स्थळ | दि. १८/०५/२०२६ दुपारी ३.०० वा.<br>आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे दालन , वैद्यकिय मुख्य कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारत |
| ४. | निविदा उघडणेचा दिनांक | दि. २६/०५/२०२६ |

कोणतेही कारण न देता निविदा पुर्णत: किंवा अंशत: मंजुर अथवा नामंजुर करणेचा अधिकार मा. आयुक्त यांनी स्वत:कडे राखुन ठेवला आहे. निविदा संचाची विक्री http://mahatenders.gov.in. संकेत स्थळावर ई-निविदा सुचनेत नमुद केलेल्या तारखेनुसार सुरु राहील. सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहीती http://mahatenders.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदरची ई – निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई – मेल support.eproc.@nic.in अथवा help Desk Number -0120-4200462, 0120-4001005, 0120-6277787 या दुरध्वनीवरती संपर्क साधावा.

सही/-
अति.आयुक्त (१)
पि.चि.मनपा.पिंपरी १८

मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्यकीय)
मसाभा/४/कावि/३२/२०२६
दि.११/०५/२०२६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८

वैद्यकीय विभाग

**ई-निविदा सूचना क्र. ०२/२०२६-२७**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाअंतर्गत राष्ट्रीय कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी दवाखाना / रुग्णालयनिहाय आवश्यक असणा-या टाटा सुमो/इको आसन क्षमता ६+१ अथवा तत्सम वाहने (टुरिस्ट परमिट) वाहने भाडे तत्वावर घेणेकामी वाहन पुरवठाधारक यांचेकडुन ई- निविदा दर मागविणे येत आहेत.

| अ. क्रं. | कामाचा तपशील | अंदाजे र.रू. | बयाणा र.रू. | अनामत र.रू. | कामाचा कालावधी | फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९ टाटा सुमो/इको अथवा तत्सम वाहने भाडे तत्वावर घेणेबाबत (आसन क्षमता ६+१) टुरिस्ट परमिट | २,१०,९०,००० /- | २,१०,९००/- | १०,५४,५००/- | २ वर्ष | २५,७६०/- |

<u>**निविदेचे वेळापत्रक**</u>

| | | |
|---|---|---|
| १. | ई निविदा उपलब्ध कालावधी | दि. १२ /०५/२०२६ ते दि. २५/०५/२०२६ |
| २. | निविदा स्वीकृती अंतिम दिनांक व वेळ | दि. २५/०५/२०२६ दुपारी ३.०० वा. पर्यंत |
| ३. | निविदा पुर्व बैठक दिनांक व वेळ<br>स्थळ | दि. १८/०५/२०२६ दुपारी ३.०० वा.<br>आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे दालन , वैद्यकिय मुख्य कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारत |
| ४. | निविदा उघडणेचा दिनांक | दि. २६/०५/२०२६ |

१) सदर निविदेतील वाहने भाड्याने घेण्याच्या कामाचा तपशील, अनामत रक्कम, नियम व अटी, निविदा वेळापत्रक इत्यादी माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) सदरची निविदा फक्त ई-टेंडरिंग पद्धतीने वरील संकेतस्थळावरच भरता येईल. निविदा दि. १२ /०५/२०२६ ते दि. २५/०५/२०२६, दुपारी ३.०० वाजेपर्यंत वेबसाईडवरुन भरता येईल.

३) निविदा फॉर्म फी आणि बयाणा रक्कम 'पेमेंट गेटवे'द्वारे भरणे अनिवार्य आहे. तांत्रिक अडचणीमुळे रक्कम विहित मुदतीत मनपा खात्यात जमा न झाल्यास आणि त्यामुळे निविदा अपात्र ठरल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची राहील. निविदेत कोणताही बदल झाल्यास तो केवळ वेबसाइटवर प्रसिद्ध केला जाईल. निविदा फॉर्मची प्रत्यक्ष (Offline) विक्री किंवा स्वीकृती केली जाणार नाही.

४) तांत्रिक माहितीसाठी मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्यकीय विभाग) किंवा लेखाधिकारी (वैद्यकीय विभाग) यांच्याशी संपर्क साधावा.

५) निविदाकारांनी निविदा भरण्याच्या अंतिम दि.२५/०५/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत खालील आवश्यक कागदपत्रे निविदेसोबत Upload करावीत व त्या कागदपत्रांच्या प्रती (Hard Copy) वैद्यकीय विभागामध्ये दिनांक-२६/०५/२०२६ पर्यंत सादर करणेत याव्यात.

I. शॉप ॲक्ट लायसन्स (नोंदणी प्रमाणपत्र).
II. PF / ESI नोंदणी प्रमाणपत्र व अद्यावत भरणा चलन (लागू असल्यास).
III. मागील ३ वर्षांचे उत्पन्न कर परतावे (IT Return: २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५).
IV. GST नोंदणी प्रमाणपत्र.
V. मागील ३ वर्षांच्या आर्थिक उलाढालीबाबत (Turnover) आणि 'बीड कपॅसिटी' बाबत सनदी लेखापालांचे (CA) प्रमाणपत्र व सत्यप्रत.
VI. शासकीय, निमशासकीय भाडे तत्वावर वाहने भाडे तत्वावर पुरवठा केल्याचा अनुभव दाखला जोडणे बंधनकारक आहे.
VII. निविदेकरिता सादर लिफाफा क्र. १ मधील सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबत रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र.
VIII. मागणीनुसार वाहने भाडे तत्वावर पुरवण्याबाबतचे हमीपत्र स्वतःच्या लेटरहेडवर देणे आवश्यक आहे.

६) निविदाकार यांनी निविदेसोबत जोडलेली ( upload ) सर्व कागदपत्रे खोटी अथवा बनावट असल्याची बाब निदर्शनास आल्यास निविदाधारक पुर्णपणे जबाबदार राहतील. त्यांचेवर भारतीय दंड विधान संहीतेनुसार कार्यवाहीस पात्र राहतील. तसेच निविदाधारकाने भरलेली अनामत, बयाणा रक्कम जप्त करून त्यांना काळ्या यादीत टाकणेत येईल.

७) निविदा दराचा ग्राह्यता कालावधी १२० दिवस राहील. परंतु अपवादात्मक परिस्थिती उद्भवलेस ग्राह्यता कालावधी वाढविणेबाबत विभागप्रमुख व त्यांचे प्राधिकृत केलेल्या अधिका-यांनी विचारणा केल्यास ग्राह्यता कालावधी वाढवुन द्यावा लागेल.

८) निविदाधारकाचे आस्थापना पुणे किंवा पिंपरी चिंचवड परिसरात कार्यालय आणि आवश्यक कर्मचारी असणे आवश्यक आहे.

९) सर्व वाहने ६+१ आसन क्षमता, टुरिस्ट परमिट (पिवळी पाटी) आणि सुस्थितीत असणे अनिवार्य आहे.

१०)निविदा मंजूर पुरवठाधारकास दोन वर्ष कालावधी एकूण निविदा रक्कमेच्या ५% प्रमाणे येणा-या रक्कमेचा अथवा राष्ट्रीयकृत बँकेचा पुणे पिंपरी चिंचवड शाखेचा एफ.डी.आर. स्वरुपात अनामत स्वतंत्र सादर करावी लागेल. कामाचा हमी कालावधी संपल्यानंतर अनामत रक्कम परत केली जाईल.

११) आर्थिक उलाढाल आणि अनुभव (पोस्ट क्वालिफिकेशन क्रायटेरिया) - र.रु. १कोटीपेक्षा जास्त रक्कमेच्या कामांना खालीलप्रमाणे पोस्ट क्वालिफिकेशन क्रायटेरीयाची तरतुद असेल. अनुभव,परिमाण, उलाढाल, सक्षमता, इ. बाबत खालीलप्रमाणे पुर्तता करणे बंधनकारक असुन खालील अ व ब मधील प्रमाणपत्रे ही सक्षम प्राधिका-याने दिलेली असावीत. तसेच खाजगी संस्था / लिमिटेड कंपनीस पुरवठा केला असल्यास प्रमाणपत्रे ही त्या संस्थेचे मालक / चिफ एक्सिक्युटिव्ह ऑफिसर यांनी दिलेली असावीत.

| | | | |
|---|---|---|---|
| अ | मागील ५ वर्षातील कंत्राटदाराची कामाची उलाढाल | मागील ५ वर्षांतील सरासरी वार्षिक उलाढाल ही कामाच्या वार्षिक अंदाजित किमतीच्या किमान ७५% | सदनी लेखापाल यांचे कडील प्रमाणपत्र |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असावी. | |
| ब | मागील ५ वर्षात कंत्राटदाराने तुल्यबळ किंमतीचे किमान एक त्याच स्वरुपाचे काम पुर्ण केले असले पाहीजे | मागील ५ वर्षांत खालीलपैकी किमान एक निकष पूर्ण असावा<br>अ) अंदाजित रकमेच्या ४०% किमतीची ३ समान कामांची पूर्तता.<br>किंवा<br>ब) अंदाजित रकमेच्या ५०% किमतीची २ समान कामांची पूर्तता.<br>किंवा<br>क) अंदाजित रकमेच्या ८०% किमतीची १ समान कामाची पूर्तता | कामकाजाचे आदेश किंवा कामकाजाचा करारनामा व संबंधित संस्थेकडील अनुभव दाखला |

१२)वाहनाचे इंधन, ड्रायव्हर पगार, विमा, देखभाल-दुरुस्ती आणि सर्व कर समाविष्ट करुन एकूण खर्चासह सोबत जोडलेल्या प्रपत्र- अ मध्ये दर सादर करावेत. निविदेमध्ये १२तासाकरिता प्राप्त होणारा लघुत्तम दर BOQ मधील क्र.१ प्राप्त दरानुसार निविदाकारांची निविदा (L1) म्हणून स्विकृत करण्यात येईल. तसेच ८० कि.मी. पेक्षा जास्त कि.मी. करिता वाहन गेल्यास BOQ मधील क्र.२ नुसार प्राप्त लघुत्तम दर ग्राह्य धरणेत येईल.

१३)सदर निविदा दर २ वर्ष कालावधी करीता मागविणेत येत आहेत. २ वर्ष कालावधीसाठी करारनामा करुन द्यावा लागेल. करारनामा स्वखर्चाने दिलेल्या मुदतीत करुन द्यावा लागेल. अन्यथा निविदा रद्द करणेत येईल.

१४) निविदा मंजूर पुरवठाधारकास भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ च्या कलमातील तरतूदींची पुर्तता करणेची जबाबदारी ठेकेदार / संस्था यांची राहील.

१५)निविदा मंजुर धारकास निविदा रक्कमेतील पहिल्या १० लाखापर्यंत र.रु. ५००/- व पुढील प्रत्येक १ लाखा करीता र.रु. ०.१% प्रती वर्षा प्रमाणे येणा-या रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर स्वखर्चाने करारनामा करून द्यावा लागेल.मुदतीत स्वखर्चाने करारनामा करुन न दिल्यास अथवा करारनामा देणेस टाळाटाळ करत असलेचे निदर्शनास आलेस निविदा रद्द करणेत येईल.

१६)निविदाधारक यांची संस्था ही म.न.पा.चे विद्यमान नगरसेवक / स्विकृत सदस्य यांचेशी संबंधीत नसलेबाबत र.रू.१००/- स्टॅंप पेपरवर प्रतिज्ञापत्र करून द्यावे लागेल

१७)करारनामा मा.स्थायी समिती सभा सदस्यांकडुन स्वाक्षरी व मोहरबंद झाल्याशिवाय कामाचे आदेश दिले जाणार नाही.

१८)आदेशाच्या दिनांकापासून त्वरीत वाहनांचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. आदेशामध्ये दिलेल्या वाहनाच्या संख्येनुसार त्वरीत वाहनांचा पुरवठा केला नाहीतर व त्याकामी ठेकेदाराने मुदतवाढीची मागणी केलेनंतर त्यांना मुदतवाढ देणे अथवा न देणे याचा अधिकार करारनामा करुन घेणार यांना राहील.

१९)वाहन नादुरुस्त झाल्यास तात्काळ पर्यायी वाहन द्यावे. विलंब झाल्यास रु.१०००/- प्रति दिवस दंड आकारला जाईल.

२०)वाहनचालकाने नशापान करू नये. तक्रार प्राप्त झाल्यास चालक तात्काळ बदलावा लागेल.

२१)वाहने कार्यरत असलेल्या विभागाने त्यांचे मार्फत वाहनावरील कर्मचा-यांना कामकाज चालु कालावधीपर्यंत ओळखपत्र पुरविणेत यावे.

२२)निविदेची मुदत २ वर्ष असली तरी मनपा केव्हाही काम बंद करू शकेल व निविदेचा कालावधी संपुष्टात आणेल.याबाबतचा अंतिम अधिकार मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी १८ यांचा राहील.

२३)महापालिकेस जेवढया वाहनांची आवश्यकता भासेल तेवढ्याच वाहनांचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. भविष्यात यापेक्षा कमी / जास्त वाहनांची आवश्यकता भासलेस निविदा मंजूर दरामध्ये पुरवठा करणे निविदाधारकास बंधनकारक राहील.

२४)सदर निविदेचा कालावधी ०२ वर्ष राहणार आहे. निविदा धारकाकडून सादर होणा-या दरात शासनाकडील (शासकिय / निमशासकिय) सर्व कारांचा समावेश करून दर सादर करावेत. शासनाने भविष्यात करात वाढ केल्यास ती मंजूर निविदा धारकास लागू असणार नाही.

२५)सदर वाहनांचा वापर हा पिंपरी चिंचवड मनपाचे दवाखाने/ रुग्णालयामधील अधिकारी व कर्मचारी यांना राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सर्व प्रकारची कामे, लसीकरणा विषयक कामकाज व रुग्णालय प्रमुख यांनी दिलेल्या आदेशानुसार इ. कामकाज करणे आवश्यक आहे.

२६)पुरवठाधारकाने वाहने १२तासांसाठी भांड्याने देणे बंधन कारक राहील. तसेच आवश्यकता भासल्यास यापेक्षा जास्त वेळेकरता वाहन पुरविणे बंधककारक  राहील. कामकाजाची  वेळ रुग्णालयाच्या सोईनुसार ठरविणेत येईल.

२७)मंजुर केलेले  दर निविदा धारकांवर बंधनकारक राहतील.

२८)लॉग बुक दररोजचे स्पिडो मिटरवरील  रिडिंग नोंदवून संबंधित अधिकाऱ्याची स्वाक्षरी घेणे अनिवार्य आहे. त्याशिवाय बिल अदा केले जाणार नाही.

२९)ड्रायव्हरचा गणवेश आणि चारित्र्य पडताळणी (Police Verification), शासकीय कामासाठी ड्रायव्हरची पार्श्वभूमी तपासणे आवश्यक असते.

३०)वाहनचालकाकडे वैध व्यावसायिक परवाना (TR License) असणे आवश्यक आहे. तसेच, सर्व चालकांचे पोलीस चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र (Police Verification) ठेकेदाराने सादर करणे अनिवार्य राहील. कामावर असताना चालकाने स्वच्छ गणवेश (Uniform) परिधान करणे आवश्यक आहे.

३१)सर्व वाहनांचे वैध PUC प्रमाणपत्र आणि विमा (Insurance) अद्ययावत असणे आवश्यक आहे. वाहने BS-VI (BS-6) मानकांनुसार असावीत.

३२)शासन व मनपा लेखापरिक्षणात भविष्यात सदर निविदेबाबत काही त्रुटी अथवा आक्षेप आढळल्यास त्याची पुर्तता करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

३३)बिल आदायगीचे कामकाज हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका, वैद्यकीय  विभागामार्फत होणार आहे. बिल आदायगी करिता आवश्यकते प्रमाणपत्र / दाखले हे वाहन वापर रुग्णालय / दवाखाना प्रमुख यांनी उपलब्ध करून घेणे बंधनकारक  राहील. त्याशिवाय  बिल अदा केले  जाणार नाही.

३४)पुरविण्यात येणारी सर्व वाहने ही सुस्थितीत असावीत. जुनी किंवा मोडकळीस आलेली वाहने स्वीकारली जाणार नाहीत.

३५)मोटार गाड्यांची दुरुस्ती व देखभाल निविधा धारकाने स्वखर्चाने नियमित व तात्काळ करणे बंधनकारक राहील. सर्व गाड्या सुस्थितीत पुरविणेची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

३६)निविधारकाने पुरविणेत येणा-या वाहनांचे वाहन चालकासोबत/वाहनासोबत मोटार सारथीकडे आर.टी.ओ. चे पक्के ड्रायव्हींग लायसन्स (TR), टुरिस्ट वाहनांचे आर.सी.टी.सी., इन्सुरन्स, टुरीस्ट परवाना इत्यादी कागदपत्रे सतत जवळ बाळगणे बंधनकारक.

३७)वाहनचालकाचा मागील महिन्याचा पगार जमा झाल्यशिवाय चालु महिन्याचे बिल अदायगी कामी स्विकारणेत येणार नाही.

३८)PANIC + GPS Tracking सिस्टम वाहनांवर बसविणे आवश्यक आहे

३९)सदरची निविदा स्विकृतीचे अंतीम दिनांकाचे दिवशी ३.३० वाजता किंवा निविदा कमिटी ठरवेल त्या दिवशी निविदा उघडण्यात येईल. निविदा उघडण्याच्या वेळी निविदाकार स्वत:अथवा त्यांचा अधिकृत प्रतिनिधी उपस्थीत राहू शकेल.

४०)गाडीला / वाहनास अपघात झाल्यास ड्रायव्हर व आमच्या कार्यालयाकडील अधिकारी, पदाधिकारी, सेवक, कर्मचारी तसेच त्रयस्थ वाहन अगर व्यक्ती, पादचारी यांना विमा मिळवुन देणेची संपुर्ण जबाबदारी निविदाधारकाची राहील. पुरवठा करणेत आलेल्या सर्व वाहनांचा नियमाप्रमाणे विमा उतरीवणे बंधनकारक राहील.

४१)निविदा अंतिम झालेनंतर निविदाधारकाने नेमणूक केलेले वाहन चालक व वाहन क्रमांक यादीसह कार्यालयाकडे सादर केली जावी तसेच भविष्यात चालक व वाहनांमध्ये होणाऱ्या कोणत्याही बदलाची वैद्यकीय विभागाला रीतसर माहिती देणे बंधनकारक राहील.

४२)या कामाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा वादविवाद निर्माण झाल्यास तो लवादच्या तरतुदीनुसार सोडविणेत येईल. याकामी मा. आयुक्त यांची लवाद म्हणून नेमणूक करणेत येईल लवादचा निर्णय अंतिम राहील व तो दोन्ही पक्षांवर बंधनकारक राहील.

४३)कोणतेही कारण न देता निविदा पुर्णतः किंवा अशंतः मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार मा. आयुक्त यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.

४४)अटीयुक्त निविदा स्विकारली जाणार नाही.कोणतेही कारण न देता निविदा पुर्णत: किंवा अशंत: मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार मा. आयुक्त यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे. सदरची निविदा http://mahatenders.gov.in. या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**सही/-**
**अति.आयुक्त (१)**
**पि.चि.मनपा.पिंपरी १८**

निविदेतील सर्व अटी-शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत.

निविदाधारकाची सही व शिक्का

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी -१८.**
**वैद्यकीय विभाग**
**ई-निविदा सुचना क्रमांक - ०२/२०२६-२०२७**
**निविदा शेड्युल**
प्रपत्र अ

| **अ.क्र.** | **कामाचा तपशिल** | **सर्व करासहीत प्रति वाहन प्रतिदिन र. रु. (जीएसटी वगळुन)** |
|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत राष्ट्रीय कार्यक्रमाकरिता १९ टाटा सुमो/इको अथवा तत्सम वाहने भाडे तत्वावर घेणेबाबत (आसन क्षमता ६+१) टुरिस्ट परमिट, प्रति दिन वापर १२ तासाकरिता, प्रतिवाहन ८०कि.मी. साठीचा दर | |
| २ | प्रतिदिन ८० कि.मी. पुढील प्रत्येक कि.मी.साठीचा दर | |

१) टीप- वाहनाचे इंधन, ड्रायव्हर पगार, विमा, देखभाल-दुरुस्ती आणि सर्व कर समाविष्ट करुन एकूण खर्चासह सोबत जोडलेल्या प्रपत्र- अ मध्ये दर सादर करावेत. निविदेमध्ये १२तासाकरिता प्राप्त होणारा लघुत्तम दर BOQ मधील क्र.१ प्राप्त दरानुसार निविदाकारांची निविदा (L1) म्हणून स्विकृत करण्यात येईल. तसेच ८० कि.मी. पेक्षा जास्त कि.मी. करिता वाहन गेल्यास BOQ मधील क्र.२नुसार प्राप्त लघुत्तम दर ग्राह्य धरणेत येईल.

**सही/-**
**अति.आयुक्त (१)**
**पि.चि.मनपा.पिंपरी**

Signature Not Verified
Digitally signed by PRASANTKUMAR SOMNATH FARANDE
Date: 2026.05.11 13:25:59 IST
Location: Maharashtra-MH